# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ १२८ /२०२२ दि. २८ /१२/२०२२

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात व ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत शासकीय कार्यालये, मा. मुख्य सत्र न्यायालय, रेल्वे स्टेशन परिसर, मुख्य बाजारपेठ असून सणानिमित्त सदर परिसरात मोठया प्रमाणात गर्दी होते. तसेच ठाणे शहरातील व शहराबाहेरील नागरिकांची कामानिमित्त मोठया प्रमाणात वर्दळ होत असल्याने सदर ठिकाणी दैनंदिन वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असते.

**ज्याअर्थी,** ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत रस्त्याचे कडेला दुचाकी, चार चाकी वाहने अस्ताव्यस्तपणे उभी करण्यात येत असल्याने इतर वाहनांना वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्यासाठी खालील ठिकाणी **नो पार्किंग, पी–१ व पी–२ पार्किंग** व्यवस्था होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**१) नो पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | नो पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | टॉवर नाका परिसर व भाजी मार्केट | नो पार्किंग | १०० मीटर | २४ तास |
| २ | टेंभीनाका ते कोर्टनाका सर्कल | नो पार्किंग | १५० मीटर | २४ तास |
| ३ | पोलीस स्कुल – खारकळ आळी ते पेढया मारुती मंदिर जांभळीनाका | नो पार्किंग | ३०० मीटर | २४ तास |
| ४ | जवाहर बाग ते ए वन फर्निचर | नो पार्किंग | १०० मीटर | २४ तास |
| ५ | शिवसागर हॉटेल स्टेशन रोड ते अशोक सिनेमा परिसर | नो पार्किंग | १०० मीटर | २४ तास |
| ६ | चिंतामणी ज्वेलर्स गल्ली | नो पार्किंग | ५० मीटर | २४ तास |

**२) पी–१ व पी–२ पार्किंग व्यवस्था करण्यात आलेले ठिकाण :–**

| अ.क्र. | पार्किंगचे ठिकाण | प्रकार | अंतर | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जांभळी नाका (डावी बाजू) | पी–१ | २०० मी. | ०८:०० ते १४:०० |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जांभळी नाका (उजवी बाजू) | पी–२ | २०० मी. | १४:०० ते २०:०० |
| ३ | मुख्य बाजारपेठ जांभळी नाका ते ए वन फर्निचर जनता फॅशन कॉर्नर (डावी बाजू) | पी–१ | ३०० मी. | विषम तारीख |
| ४ | मुख्य बाजारपेठ जांभळी नाका ते ए वन फर्निचर जनता फॅशन कॉर्नर (उजवी बाजू) | पी–२ | ३०० मी. | सम तारीख |
| ५ | शासकीय विश्रामगृह, एन.के.टी. कॉलेज रोड ते मौसम साडी सेंटर (डावी बाजू) | पी–१ | २०० मी. | विषम तारीख |
| ६ | शासकीय विश्रामगृह, एन.के.टी. कॉलेज रोड ते मौसम साडी सेंटर (उजवी बाजू) | पी–२ | २०० मी | सम तारीख |
| ७ | मालतीबाई हॉस्पिटल ते टेंभी नाका (डावी बाजू) | पी–१ | १०० मी. | विषम तारीख |
| ८ | मालतीबाई हॉस्पिटल ते टेंभी नाका (उजवी बाजू) | पी–२ | १०० मी. | सम तारीख |

CS CamScanner

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात येत आहे. काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतूक शाखा कार्यालय, तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, ठाणे, ४००६०२ येथे पाठवाव्यात. याबाबत कोणाच्या काही हरकत अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर** :–
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

**प्रत कार्यवाहीसाठी** :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. ठाणेनगर, नौपाडा, कोपरी वाहतूक उप विभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner